अखिल भारतीय सेवेतील, राज्यसेवेतील तसेच सार्वजनिक उपक्रम, मंडळे, महामंडळे इत्यादींचे अधिकारी/पदाधिकारी यांच्या परदेश दौ-याबाबत.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक:सीडीआर. १०९६/८७/प्र. ४/९६/११,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक :- ३१ डिसेंबर, १९९६.

वाचा:-१. शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:सीडीआर. १०९६/८७/प्र. ४/९६/११, दिनांक ६एप्रिल, १९९६.
२. शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:सीडीआर. १०९६/८७/प्र. ४/९६/११, दिनांक २४ ऑक्टोबर, ९६.

## प रि प त्र क

शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-सीडीआर. १०९६/८७/प्र. ४/९६/११, दिनांक ६ एप्रिल, १९९६अन्वये मुख्य सचिवांचे अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या शिफारस समितीची खाली नमूद केल्यानुसार पुनर्रचना करण्यात येत आहे :-

| | |
|---|---|
| १] मुख्य सचिव | अध्यक्ष |
| २] अपर मुख्य सचिव [गृह] | सदस्य |
| ३] अपर मुख्य सचिव [वित्त] | सदस्य. |

शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:सीडीआर. १०९६/८७/प्र. ४/९६/११, दिनांक २४ ऑक्टोबर, ९६नुसार अशा सूचना देण्यात आल्या होत्या की, परदेश दौ-याचा प्रस्ताव शासन परिपत्रक, दिनांक ६. ४. ९६नुसार तपासण्यात आल्यानंतर तो सामान्य प्रशासन विभाग व वित्त विभागाने पाहिल्यानंतरसंबंधित खात्याच्या मंत्री महोदयांना मान्यतेसाठी सादर करण्यात यावा व त्यांची मान्यता घेतल्यानंतर शिफारस समितीपुढे सादर करावा. या सूचनेच्या संदर्भात आता खालीलप्रमाणे खुलासा करण्यात येत आहे :-

ज्या परदेश दौ-यांच्या प्रस्तावात राज्य शासनावर स्थानिक खर्चाव्यतिरिक्त इतर खर्चाचा भार पडणार नसेल अशी प्रकरणे वित्त विभागास न दाखविता सामान्य प्रशासन विभागाने पाहिल्यानंतर व संबंधित खात्याच्या मंत्रीमहोदयांची मान्यता घेतल्यानंतर शिफारस समितीपुढे सादर करावीत.

तसेच परदेश दौ-याचा खर्च जर जागतिक बँक, केंद्र शासन अथवा ज्या देशात असे परदेश दौरे आयोजित केले असतील ते देश उचलत असतील, याच्याव्यतिरिक्त खर्चाचा भार इतर अशासकीय संस्था सोसणार असतील व परदेशी आतिथ्याचा

कृ. मा. प.

प्रश्न निर्माण होत असेल तर असे प्रस्ताव वित्त विभागास दाखविण्यात यावेत.

वर नमूद केल्यानुसार यापुढे विभागांनी कार्यवाही करावी.

अन्य कार्यवाही मात्र शासन परिपत्रक समक्रमांक दिनांक ६ एप्रिल, ९६ व २४ ऑक्टोबर ९६ नुसारच करावयाची आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

१.१.९७

[रवि भू बुधिराजा]
सचिव [सेवा]

प्रति,

राज्यपालांचे सचिव,
मुख्यमंत्र्यांचे सचिव/उपमुख्यमंत्र्यांचे सचिव,
शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
मुख्य सचिवांच्या कार्यालयातील सह सचिव,
सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/स्वीय सहाय्यक,
सामान्य प्रशासन विभाग/का. ८, १०, १२-अ, १९, २०, २८-अ, ३४,
सर्व मंत्रालयीन विभाग.

निवड नस्ती